दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com vadalvartanews@gmail.com मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● मंगळवार २१ मे २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २७७ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# सोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट बीड पोलिसांकडून ४२ जणांवर कारवाई

## सोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट टाकू नये समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती, राजकीय नेते, दोन समाजात तेढ निर्माण होईल असे वक्तव्य करु नये,

चार दिवसांपूर्वीच केज तालुक्यातील नांदूरघाट येथे एका पोस्टमुळे दोन गटात दगडफेक झाली. यात अनेकजण जखमी झाले. २०० पेक्षा अधिक लोकांवर गुन्हाही दाखल झाला. त्यानंतर इतर ठिकाणीही निवडणूक कारणावरून वाद झाले आहेत हे वाढते वाद पाहता पोलिसांनी शांततेचे आवाहन केले आहे

**(बीड प्रतिनिधी)**

सोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट टाकून दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न काही लोकांकडून केला जात आहे अशाच लोकांचा शोध घेऊन बीड पोलिसांकडून कारवाया केल्या जात आहेत. शनिवारपर्यंत ४२ लोकांबर कारवाई करण्यात आली. त्यांना पोस्ट काढून टाकायला लावत पोलिसांनी नोटीसही बजावली. तसेच यानंतर वादग्रस्त पोस्ट केल्यास थेट गुन्हा दाखल करण्याचा इशारा दिला आहे. जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीचा प्रचार आणि मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली परंतु त्यानंतर सोशल मीडियावरून वातावरण तापु लागले आहे काही लोक आक्षेपार्ह पोस्ट टाकत असल्याने वाद होऊ लागले आहेत.



चार दिवसांपूर्वीच केज तालुक्यातील नांदूरघाट येथे एका पोस्टमुळे दोन गटात दगडफेक झाली. यात अनेकजण जखमी झाले. २०० पेक्षा अधिक लोकांवर गुन्हाही दाखल झाला. त्यानंतर इतर ठिकाणीही निवडणूक कारणावरून वाद झाले आहेत हे वाढतेवाद पाहता पोलिसांनी शांततेचे आवाहन केले आहे. तसेच सोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट




टाकू नये समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती, राजकीय नेते, दोन समाजात तेढ निर्माण होईल असे वक्तव्य करू नये,असे सांगितले आहे असे असतानाही काही लोकांनी वादग्रस्त पोस्ट केल्या होत्या. त्यांचा शोध घेऊन पोलिसांनी त्यांना सीआरपीसी १०७, १०९, १०८, १४९ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाया केल्या आहेत तसेच त्यांना पोलिस ठाण्यात बोलावून घेत समज देण्यात आली याच अनुषंगाने पाच दिवसांपूर्वी युसूफ वडगाव पोलिस ठाण्यात गुन्हाही दाखल झालेला आहे.

# जिल्ह्यात ३१ मे रोजी रात्री २४ वाजेपर्यंत मनाई आदेश लागू



**( बीड प्रतिनिधी )**

बीड, दि. 20 :- दि. 23 मे 2024 रोजी बौध्द पोर्णिमा साजरी होणार असल्याने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी जिल्हादंडाधिकारी दिपा मूधोळ- मुंडे यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे. दिनांक 17 मे 2024 रोजीचे 00.01 वाजेपासून ते 31 मे 2024 रोजीचे 24.00 वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा 37 (1) (3) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता कलम 37 (1) (3 ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये. जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय 15 दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

# बजरंग बप्पा सोनवणे यांनी घेतली स्वानंदच्या परिवाराची सात्वनपर भेट

**वादळवार्ता/बीड**

कुणबी नोंद न सापडल्यामुळे पालवण ता.जि. बीड येथील तरुण युवक स्वानंद हनुमान मस्के यांनी आपले जीवन संपविले. आज बजरंग बप्पा सोनवणे यांनी त्यांच्या कुटुंबाची सांत्वनपर भेट घेवून विचारपूस केली. यावेळी समाजास उद्देशून त्यांनी सांगितले कि समाजातील सर्वांना हात जोडून माझी विनंती आहे, आपला लढा शेवटच्या टप्प्यात येवून ठेपला आहे. कोणीही आपल्या मनात वाईट विचार न आणता आपल्या परिवाराचा विचार करुन आनंदी जीवन जगण्याचा प्रयत्न करा. आपण यशस्वी होणार आहोत फक्त काही दिवस धीर धरा असे भावनिक आवाहनही केले .



## कपिलधार वाडी येथे काल ह्.भ.प बाल कीर्तनकार सोहम महाराज सातपुते यांची कीर्तन सेवा संपन्न

**वादळवार्ता प्रतिनिधी** कपिलधार वाडी येथे काल ह.भ.प बाल कीर्तनकार सोहम महाराज सातपुते यांची कीर्तन सेवा संपन्न झाली यावेळी त्यांचा वतीने सत्कार करण्यात आला यावेळी श्रीमंत सव्वाशे, रुद्रा महाकले, नवनाथ शिंदे,बाळू शिंदे,पप्पू शिंदे, बप्पा शिंदे, कांताराम शिंदे, लक्ष्मण जाधव, ह. भ.प. वैजिनात महाराज शिंदे, ह. भ.प अंगात महाराज सातपुते, ह.भ.प.तुळशीदास शिंदे, ह.भ.प योगेश महाराज जोगदंड, ह.भ.प शिवाजी महाराज निवडे आदि मान्यवर मंडळी दिसत आहेत. तसेच सप्ताह कमिटी च्या वतीने सत्कार करण्यात आला



# बनसारोळा प्राथमिक आरोग्य दर्जा केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा आ.नमिता मुंदडा यांची आणखी एक वचनपूर्ती

**बीड : प्रतिनिधी**

तालुक्यातील आडस,विडा पाठोपाठ बनसारोळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास देखील ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा देण्यात येत असल्याचे राज्य शासनाने जाहीर केले आहे. केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी या तिन्ही ठिकाणी ग्रामीण रुग्णालय सुरु करू अशी ग्वाही दिली होती. आ.मुंदडा यांनी दिलेला शब्द प्रयत्नपूर्वक खरा करून दाखवल्याने ग्रामस्थांतून समाधान व्यक्त होत आहे. बनसारोळा हे केज तालुक्यातील महत्वाचे गाव आहे. तालुक्यातील ग्रामीण भागातील हे महत्वाचे शैक्षणिक केंद्र देखील आहे. तसेच मोठ्या बाजारपेठेमुळे आजूबाजूची लहानसहान सर्व खेडेगावातील लोकांची वर्दळ बनसारोळा येथे असते. आरोग्यसेवेच्या दृष्टीने येथे प्राथमिक आरोग्य केंद्र असून त्या ठिकाणी दररोज कमालीची गर्दी असते. वाढत्या लोकसंख्येच्या मानाने हे प्राथमिक आरोग्य केंद्र सुविधा पुरविण्यास असमर्थ ठरू लागले होते.आजारी व अपघातग्रस्त व्यक्तींना दूरच्या रुग्णालयात घेऊन जावे असल्याने अनेक रुग्णांच्या जीवावर बेतले आहे. त्यामुळे या भागासाठी ग्रामीण रुग्णालयाची नितांत आवश्यकता होती. हि बाब लक्षात घेत आ.नमिता मुंदडा यांनी मागील चार वर्षापासून बनसारोळा प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन करण्याची मागणी राज्य शासनाकडे करून त्यासाठी पाठपुरावा सुरु ठेवला होता. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून राज्य शासनाने विडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचा दर्जावाढ करण्याचा निर्णय घेतला असून



लवकरच या ठिकाणी आता तीस खाटांचे ग्रामीण रुग्णालय होणार आहे. त्यामुळे बनसारोळा आणि आजूबाजूच्या ग्रामीण भागाला चांगली आरोग्यसेवा मिळणे शक्य होणार आहे. याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार,आरोग्यमंत्री तानाजी सावंत,भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे,बीडच्या खासदार प्रीतमताई मुंडे यांचे आ.नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

कविता

# 'आम्ही मतदार'

आम्ही मतदार,
लोकशाहीचा आधार,
मताने आमच्या,
घेईल लोकशाही आकार,

आम्ही मतदार,
भावी पिढीचे शिल्पकार,
देऊ सर्वांना,
समानतेचा अधिकार,

आम्ही मतदार,
करून मतदान,
राखू लोकशाहीच्या उत्सवात,
संविदानाचा मान,

आम्ही मतदार,
देऊ निवडून योग्य उमेदवार,
लावू देशाच्या विकासाला,
मोलाचा हातभार,

आम्ही मतदार,
आम्हाला स्वातंत्र्य विचारांचे,
जागर करून लोकशाहीचा,
तोडू पाश भ्रष्टाचाराचे,

आम्ही मतदार,
नको सहानुभूती आम्हाला,
किंमत आहे इथे,
आमच्या एका मताला.

**मंगेश शिवलाल बरई.**
**हिरावाडी, पंचवटी, नाशिक-४२२००३.**

# बिंदुसरा नदीपात्राशेजारील ३०० घरांना महापुराचा धोका ; मान्सुनपुर्व साफसफाईची जिल्हाधिका-यांना मागणी :- डॉ.गणेश ढवळे



बीड:- मान्सून कालावधीत पुर अथवा वादळांमुळे नैसर्गिक आपत्ती येण्याची दाट शक्यता असते या परिस्थितीला तोंड देण्यासाठी जिल्हा प्रशासन आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करून आधिका-यांच्या बैठका घेण्याचा सपाटा लावत संबंधित कार्यालयात २४ तास नियंत्रण कक्ष सुरू करते मात्र बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रातील फ्लड झोन (पुर नियंत्रण रेषा) मध्ये सुरु असलेल्या अनाधिकृत बांधकाम आणि नदीपात्रातील उगवलेल्या बाभळीमुळे नदीपात्रात अरूंद झाले असुन झाडांना पाणी आडुन शहरात शिरण्याची दाट शक्यता असुन बिंदुसरा नदीपात्राशेजारील ३०० घरांना महापुराचा धोका असुन त्याकडे दुर्लक्ष करताना दिसत आहे त्यामुळे एकंदरीत आपत्ती व्यवस्थापनाच्या बैठका नेहमीप्रमाणेच वांझोट्या ठरणार आहेत.त्यामुळे संबंधित प्रकरणात तातडीने उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे,शेख युनुस,सुदाम तांदळे , शिवशर्मा शेलार , रामनाथ खोड यांनी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, विभागीय आयुक्त यांना केली आहे.

भुमाफियांच्या पाठीशी नगरपरिषद प्रशासन ; नदीपात्रात अनाधिकृत बांधकाम बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रातील पुर नियंत्रण क्षेत्रातील भुमाफियांकडुन करण्यात आलेल्या व सुरू असलेल्या अनाधिकृत बांधकामाकडे नगरपरिषद अधिकारी आणि कर्मचारी जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत असुन बीड शहरातील नदी नाले,ओढे यांच्यावर राजकीय पुढारी, कार्यकर्ते, मुख्याधिकारी नगरपरीषद बीड, नगररचनाकार,भुमिअभिलेख, जलसंपदा विभाग कार्यालय यांनी संगनमतानेच भुमाफियांशी आर्थिक लाभातुन हातमिळवणी केली आहे. बीड शहरातील नदी,नाले,ओढे यांचे सर्व्हेक्षण करणे गरजेचे आहे. सव्हेक्षण नसल्याने रेडफ्लर्ड लाईन व ब्लूलाईन हा पट्टा ठरविण्यात आला नसल्याने नगरपरिषद प्रशासन याचा गैरफायदा घेत असुन अतिक्रमित बांधकाम प्रकरणी कंत्राटदार व जबाबदार प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. बिंदुसरा नदीपात्राशेजारील ३०० घरांना पुराचा धोका , वित्तहानी व जिवितहानीची शक्यता ; आपत्ती व्यवस्थापनाच्या वांझोट्या बैठका

महापुर येण्यास पुरक्षेत्रातील अतिक्रमणे, अवैध बांधकाम कारणीभूत असुन त्यामुळे पुरबाधित क्षेत्र असलेल्या ब्लु आणि रेड झोनमध्ये बांधकामांना परवानगी देण्यात येऊ नये असे मुख्यमंत्री यांचे स्पष्ट आदेश असतानाही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. १९८९ साली अतिवृष्टीमुळे शहरातील अनेक भागात पाणी शिरल्याने मोठ्या प्रमाणात आर्थिक व जिवितहानी झाली होती आणि २०१४ आणि २०२१ साली झालेल्या अतिवृष्टीमुळे शहरात पुर सदृश स्थिती निर्माण झाली होती. मोठ्या प्रमाणात नागरीकांना याचा फटका बसला होता.शहरातील विविध भागांमध्ये पाणी शिरल्याने शहरवासीयांना मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागले होते. बिंदुसरा नदीपात्रा शेजारील राहणा-या तब्बल ३०० घरांना महापुराचा धोका असुन नगरपालिकेकडुन कोणतीही उपाययोजना करण्यात येत नाही. यापुर्वीही अशा दुर्घटना घडुन वित्तहानी व जिवितहानी झालेली असुन शहरातील मोमीनपुरा, खासबाग,जुना मोंढा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक,पेठ बीड भागातील लोकांची पुर आल्यानंतर तारांबळ उडते. त्यामुळे तातडीने उपाययोजना करण्यात यावी. नदीपात्रातील बाभळबनामुळे पाणी शहरात शिरण्याची शक्यता झाडांची साफसफाई आवश्यक बिंदुसरा नदीपात्रात मोठमोठी बाभळीची झाडे उगवली आहेत. त्यामुळे नदीचे पात्र अरूंद व अस्वच्छ झाले आहे.या झाडांना पाणी अडुन पाणी शहरात घुसण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे तातडीने साफसफाई करण्याची आवश्यकता आहे.

बिंदुसरा नदीपात्राचा डंपिंग ग्राउंड म्हणून वापर नदीपात्रातील जैविक कचरा आरोग्यास घातक शहरातील आसपासच्या भागातील कचरा,घाण पाणी तसे रूग्णालयातील घातक कचरा उचलुन बिंदुसरा नदीपात्रात टाकला जात असल्याने नदीचे पात्र अरूंद होण्याबरोबरच नागरीकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत असुन रूग्णालयातील जैविक घातक कच-यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे त्यामुळे संबंधित प्रकरणात दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

**डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर**
**मो.नं.८१८०९२७५७२**

# नैसर्गिक आपत्ती किंवा पुरामुळे जीवित व वित्तीय हानी होणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी - विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड

## मान्सून पूर्व तयारीबाबत छत्रपती संभाजीनगर विभागाचा आढावा

**वादळवार्ता प्रतिनिधी** छत्रपती संभाजीनगर, दि. 20 : यावर्षी मान्सूनचे लवकर आगमन होणार असल्याचा हवामान खात्याचा अंदाज असून यापुर्वीची काही भागातील अतिवृष्टी व पुरपरिस्थिती लक्षात घेता यावर्षी नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवा तसेच नैसर्गिक आपत्ती किंवा पुरामुळे जीवित व वित्तीय हानी होणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी, असे निर्देश विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड यांनी दिले. छत्रपती संभाजीनगर विभाग मान्सून पूर्व तयारीबाबत आढावा बैठक विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड यांच्या अध्यक्षतेखाली आज विभागीय आयुक्त कार्यालयातील सभागृहात घेण्यात आली. यावेळी परभणीचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, जालना जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, बीड जिल्हाधिकारी दिपा मुधोळ-मुंडे, हिंगोली जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, नांदेड जिल्हाधिकारी अभिजित राऊत, लातूर जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे, धाराशिव जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, मनपा आयुक्त, निवासी उपजिल्हाधिकारी तसेच विविध यंत्रणांचे प्रमुख हे संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालय येथून दूरदृष्य प्रणालीव्दारे उपस्थित होते. तर छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, कर्नल ऋषिकेश सुर्यवंशी, जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता विजय घोगरे, उपायुक्त जगदिश मिनीयार, नयना बोंदार्डे, सुरेश वेदमुथा, ॲलीस पोरे, अतिरिक्त आयुक्त रणजित पाटील यांच्यासह प्रादेशिक विभागप्रमुख बैठकीला उपस्थित होते. विभागीय आयुक्त श्री अर्दड म्हणाले, पावसाळ्यात काही गावांचा संपर्क तुटतो. त्यादृष्टीने नागरिकांची निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था तसेच धान्य, औषधसाठा आदी सामुग्रीबाबत नियोजनपुर्वक व्यवस्था करावी. दूषित पाण्यामुळे साथीचे आजार पसरू नयेत यासाठी जलस्त्रोतांची गुणवत्ता तपासण्याबरोबरच आवश्यक तिथे पर्यायी व्यवस्था करावी. अवकाळी पावसानंतर वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी 'महावितरण'ने तत्परतेने नियोजन करावे. जिल्हा व तालुकास्तरावर असलेला नियंत्रण कक्ष 24×7 नेहमी कार्यान्वित ठेवावा. आपत्ती काळात त्वरित संपर्क करण्यासाठी विविध आवश्यक विभागांचे आणि संपर्क यंत्रणांचे संपर्क क्रमांक अद्ययावत ठेवावेत, तसेच हे क्रमांक नेहमी सक्रीय असतील याची दक्षता घ्यावी. एसडीआरएफ तसेच



एनडीआरएफची बचाव पथके स्थापन करुन आवश्यक साहित्यानिशी सुसज्ज ठेवा, असे निर्देश त्यांनी यंत्रणेला दिले.

विजेला अटकाव करणारी यंत्र सुस्थितीत असावी. नादुरुस्त स्थितीत असलेली वीज अटकाव यंत्र तात्काळ दुरुस्त करून घेण्यासोबतच जिल्हानिहाय या यंत्रणेत प्रत्येक वर्षी 100 ने वाढ करावी. महानगरात असलेले मोठे नाले, नदी यावर ये-जा करण्यासाठी असलेला लोखंडी मार्ग चांगला आहे किंवा कसे याबाबत तपासणी करावी, आवश्यकता असेल तिथे तातडीने बदल करावा. महानगरातील नाल्यांची सफाई कामे तातडीने पूर्ण करावी. जीर्ण इमारती, पूलांचे सर्वेक्षण करून सुरक्षिततेबाबतही तत्परतेने तपासणी करावी. महानगरातील ज्या भागात पावसाळ्यात आपत्कालीन परिस्थिती उद्भवते, त्यासाठी तेथील नागरिकांचे स्थलांतर कुठे करावे याबाबत पूर्वतयारी करावी. अशा सूचनाही विभागीय आयुक्त श्री अर्दड यांनी दिल्या. घाटकोपर, मुंबई येथे जाहिरात फलक कोसळण्याची घटना घडलेली आहे. मान्सून पूर्व कालावधीत व अन्य कालावधीत होणाऱ्या दुर्घटनामध्ये जीवितहानी टाळण्यासाठी शहरी भागातील व महामार्गावरील लावण्यात आलेल्या जाहिरात फलकांची रचनात्मक तपासणी करण्यात यावी. तपासणीअंती आढळून आलेले अवैध जाहिरात फलकाबाबत संबधितावर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात यावी. आपल्या अधिनस्त क्षेत्रात जाहिरात फलक कोसळून होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी दक्षतेची बाब म्हणून नैसर्गिक आपत्तीच्या वेळी जाहिरात फलकाच्या आजूबाजूला न थांबण्याबाबत नागरिकांना सूचना देण्याचे निर्देशही त्यांनी यंत्रणेला दिले. मराठवाडयातील आठही जिल्ह्यातील संभाव्य पूरबाधित तसेच दुर्गम गावे, बचाव पथकांची मोटर बोट, लाईफ जॅकेट, लाईफ रिंग्र, रोप बंडल, सर्च लाईट, मेगा फोन, ग्लोव्हज, रेनकोट, स्कूबा डायव्हिंग कीट, हेल्मेट आदी विविध साधने, बचाव पथकांची मॉक ड्रिल, संरक्षित निवारा व भोजन व्यवस्था, पिण्याचे पाणी, विज पुरवठा, नियंत्रण कक्ष, विजेचे संकेत देणारे दामिनी ॲप, नदी-नाल्यांची सफाई व खोलीकरण आदी बाबीं संदर्भात पूर्वतयारीबाबत जिल्हानिहाय जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त यांनी बैठकीत माहिती दिली. यावेळी आपत्ती विभागाशी सबंधित विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# डोंगरातला औषधी रानमेवा बाजारात

**वादळ वार्ता । प्रतिनिधी**

जिभेवर रेंगाळणारी डोंगरी रानमेव्याची चव आणि याच चवीचा आस्वाद घेण्यासाठी पर्यटकांसह नागरिक राधानगरी तालुक्यातील राधानगरी, कसबा तारळे, दुर्गमानवाड तसेच मुदाळ तिट्टा येथे बाजारपेठमध्ये विकत घेण्यासाठी गर्दी करताना दिसून येत आहे. इतर तालुक्यातील काही पर्यटक तर या रानमेव्याचा आस्वाद घेण्यासाठी राधानगरी, भुदरगड तालुक्यातील डोंगर-दऱ्यातून जंगल सफर करत आहेत.

आंबे, फणस, करवंदे, आळू, तोरणे, तोंदली, काजू, जांभळे, बोरे या आंबट, गोड, तुरट अशा जिभेवर रेंगाळनाऱ्या चवीच्या या रानमेव्याचा आस्वाद घेण्यासाठी आबालवृद्धगर्दी करत आहेत. फणस व आंबा अशा मोठ्या फळांबरोबर आपले अस्तित्व टिकवून ठेवलेला रानमेवा या महिन्यात दृष्टीस पडतो. या महिन्यात आंबा, जांभूळ, करवंद, फणस, तोंदली, तोरण, रतांबे, आळू बाजारात दाखल झाली असून ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत. रानमेवा बाजारात दाखल झाल्याने उन्हाच्या काहिलीपासून लोकांना दिलासा देण्यास पूरक ठरत आहे. अनेक रोगापासून मुक्ती देणारा रानमेवा सध्या दुर्मिळ होत असला तरी राधानगरी , भुदरगड या कोकण भागात त्याचे अस्तीत्व टिकून आहे. मधुमेह, हृदयविकार, कॅन्सर, सांधेदुखी, अशा गंभीर आजारावर मात करणारा रानमेवाचं महत्व जनतेपर्यत पोहचलेल नाही. त्यामूळे अज्ञाताकडून जंगलाला लावलेल्या आगीत रानमेवा जळून जातो. नैसर्गिकरित्या पिकलेल्या रानमेव्याला शहरात प्रचंड मागणी असुन १०



रूपयापासून अगदी १७० रूपया पर्यंत रानमेवा बाजारात विकला जात आहे. सध्या फणसाची आवक जास्त असून एका नगाची आकारावरून किंमत शंभर ते दीडशे रुपये पर्यंत असल्याचे विक्रेते गणपती पाटील सांगितले.

राधानगरी तालुक्यात मुख्य बाजारपेठ असलेल्या कसबा तारळे, राधानगरी, म्हासूर्ली, भोगावती, मुदाळ तसेच तीर्थक्षेत्र असलेल्या आदमापूर, दुर्गमानवाड येथे धनगरवाडातील महिला व पुरुष हा रानमेवा घेऊन विक्रीसाठी बसतात. रानावनात अतिदुर्गम ठिकाणी वास्तव्य करून राहिलेला हा धनगर समाज यावर आपली उपजीविका चालवतात. त्यामुळे त्यांना हंगामी रोजगाराचे साधन उपलब्ध होते.

उन्हाळ्यात मध, करवंदे, गावठी आंबे, तोरणे, पायरी, पिंपळाची फळे, आवळा, रान फणस, ताडगोळे, भोकर, जाम, जांभळे गोळा करतात आणि बाजारात येऊन विकतात. वर्षांतून एकदाच आस्वाद घ्यायला मिळणारी ही फळे खरेदी करताना दिसत आहेत.



माजी नगरसेवक तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे नेते राजू शेठ सोनी, दैनिक लोकमतचे प्रतिनिधी संजय खाकरे साहेब, मित्रवर्य श्री मनोज रामदासी यांच्या वतीने शुभेच्छा

# पन्नास वर्षीनंतर पुन्हा बांधणार रेशीम गाठी गागलेगांवातील अनोखा उपक्रम

## आईवडीलांच्या पन्नास व्या सुवर्ण महोत्सवी विवाह सोहळा...

**वादळ वार्ता । प्रतिनिधी**

बिलोली तालुक्यातील गागलेगांव येथील श्री नागनाथ विठ्ठलराव बुध्दलवाड यांनी आपल्या आई वडिलांचे ऋण व्यक्त करण्याकरिता 50 वा सुवर्ण महोत्सवी विवाह सोहळा विविध उपक्रम राबवून दिनांक 25 मे रोजी आयोजित केला आहे या 50 व्या सुवर्ण महोत्सवी विवाह सोहळ्यानिमित्त त्यांनी विविध सामाजिक उपक्रम राबवणार आहेत यात शालेय साहित्य पाठ्यपुस्तक यांचा आई-वडिला प्रमाणे तुलाभार केला जाणार आहे व तो गरजू व गरीब विद्यार्थ्यांना वितरित केले जाणार आहे व हिंदू धर्म परंपरेनुसार 24 मे रोजी रात्री महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार ह भ प यांच्या हरिकीर्तनाचा कार्यक्रम व वारकऱ्यांचा सलमान सोहळा आयोजन करण्यात आलं आहे व सोबतच स्वरूपाची व्यवस्था करण्यात आली या कार्यक्रमाला नांदेड जिल्ह्यात सह अनेक सन्माननीय मान्यवर उपस्थित राहणार आहेत परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहावे परिवारांच्या



वतीने करण्यात आले

# मांजरा धरणात एक टक्का ज़िवंत तर ४७ दशलक्ष घनमीटर पाणीसाठापाणी टंचाई भासणार नाही !

**वादळवार्ता/बीड**

बीड मांजरा धरणात सध्या १ टक्का जिवंत पाणीसाठा असून ४७ दशलक्ष घनमीटर पाणी मृतसाठ्यात आहे. यामुळे पाणी टंचाई भासणार नाही. असा विश्वास मांजरा धरणाचे शाखा अधिकारी सुरज निकम यांनी व्यक्त केला आहे. बीड आणि लातूरसह उस्मानाबाद जिल्ह्यातील पाच शहरासह ६३ गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या केज तालुक्यातील धनेगाव येथील मांजरा धरणात सध्या १ टक्का पाणीसाठा शिल्लक राहिला असून हे पाणी आणखी दहा दिवस पुरणार आहे. त्यानंतर मृतसाठ्यातील पाणी ऑक्टोबर पर्यंत पुरणार आहे. यामुळे पाणी टंचाई भासणार नाही. मांजरा धरणातून लातूर शहर, लातूर एमआयडीसी, अंबाजोगाई, केज, धारूर, कळंब या पाच शहरांसह येडेश्वरी साखर कारखाना, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील साखर कारखान्यासह केज, कळंब, लातूर तालुक्यातील ६३ गावांना पाणीपुरवठा केला जातो. यामुळे धरणातील उपलब्ध पाणीसाठा व भविष्यातील पाणीटंचाईचा विचार करून जिल्हाधिकारी दीपा मुधोळ- मुंडे यांनी ऑगस्ट महिन्यात धरणातील पाणी पिण्यासाठी आरक्षित केले होते. त्यानंतर पाटबंधारे, महसूल, विद्युत यातील विभागाची संयुक्त पथके नियुक्त करीत धरणातील विद्युत पुरवठा खंडित करून सिंचन उपशावर नियंत्रण




ठेवले. धरणातील पाणीपुरवठा योजनांच्या माध्यमातून झालेला पाणी उपसा व बाष्पीभवन यामुळे आता धरणात १ टक्का जिवंत पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. हा जिवंत पाणी साठा अजून १० दिवस पुरणार आहे म्हणून मे महिन्याच्या उर्वरित दिवसात जिवंत पाणीसाठा चालणार आहे.

# भवानवाडी येथे रोजगार हमी योजनेच्या कामात बोगस सह्या करून केला लाखोचा भ्रष्टाचार

## बीड पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्याचा मनमानी कारभार

**वादळवार्ता/बीड**

बीड तालुक्यातील भवानवाडी येथे रोजगार हमी योजनेच्या कामात परस्पर बोगस सह्या मारून मस्टर काढण्यात आले, यामध्ये लाखोचा भ्रष्टाचार करण्यात आला. एकूण बारा मस्टर वर बोगस सह्या मारून सदरील मस्टर काढण्यात आले. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) उपजिल्हाप्रमुख हनुमान जगताप यांनी भवानवाडी येथील ग्रामस्थांना घेऊन सदरील बीड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांची भेट घेऊन हा प्रकार पुराव्यासहित उघडकीस आणला आहे. अधिकारी आणि रोजगार सेवक यांच्या बोगसह केल्याने एकच खळबळ उडाली आहे.



# एक शाम जिनशासन के नाम शासन भक्तीफकार्यक्रमाचे आयोजन संपन्न

**वादळ वार्ता । प्रतिनिधी**

शासन स्थापन दिवस पर आयोजित श्री गोडीजी जैन टेंपल ट्रस्ट की आज्ञा से श्री देवसूर महासंघ के तत्वावधान में अर्हम् ग्रुप पुणे यांच्या सहयोगाने रविवारी रात्री 'एक शाम जिनशासन के नाम शासन भक्ती' सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, या कार्यक्रमात ७ संगीतकारांनी सांगीतिक प्रदर्शन केले. या कार्यक्रमाला भाजपा पुणे शहराध्यक्ष श्री. धीरज भाऊ घाटे, श्री. प्रवीण (पोपट) ओसवाल, मयुर सरनोत (वरवंडकर), Pi येरवडा जेल अरूण मदने साहेब, Acp मनोज शेडगे साहेब, राकेश जैन, संदिप लोढा, पंकज मेहता, कुमार वाघरेचा, उमेश ओसवाल, आशिष



# ड्रंक अँण्ड ड्राईव्हफप्रकरणी तात्काळ उपाययोजना करा

## पोलीस आयुक्तांची मुरलीधर मोहोळ यांनी महायुतीच्या शिष्टमंडळासह घेतली भेट

**वादळ वार्ता । प्रतिनिधी**

पुणे शहरातील कल्याणीनगरमध्ये रविवारी पहाटे भरधाव वाहनाने तरुण-तरुणीला चिरडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. या अपघातात दोघांचाही जागेवरच मृत्यू झाल्याची बातमी ऐकून मनाला अतिशय वेदना झाल्या. पुणे हे विद्येचे माहेरघर आणि राज्याची सांस्कृतिक राजधानी आहे. मात्र गेल्या काही वर्षांपासून पुणे शहराच्या संस्कृतीला धक्का लागणारे प्रकार घडले आहे. त्यात नाईट-लाईफ कारणीभूत असल्याचे समोर येत आहेत. यामुळे तरुण-तरुणी व्यसनाच्या अधीन होताना दिसत आहेत. यातूनच अशा दुर्दैवी घटनांना आपल्याला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर उपाययोजना कराव्यात, या संदर्भात पुणे पोलीस आयुक्त श्री. अमितेश कुमार यांच्या महायुतीच्या शिष्टमंडळासह भेट घेतली. यावेळी पुण्यात सुरु असलेली नाईट-लाईफ संस्कृती थोपविण्यासाठी रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या पब, बार यांच्यावर कारवाई करण्यात यावी. तसेच पबमध्ये सुरु असणाऱ्या पार्ट्यांसाठी डीजेवर लावण्यात येणारी गाणी ही अतिशय अश्लील पद्धतीची असतात. त्यामुळे त्यावर लगाम घातला पाहिजे तसेच मध्यरात्री शहरातील अनेक चौकाचौकात तरुण-तरुणी गर्दी करुन हुल्लडबाजी करत असतात. त्यावर चाप बसविण्यासाठी पोलिसांची गस्त वाढवावी यासह विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले . यावेळी मुरलीधर मोहोळ अजय भोसले, योगेश टिळेकर,गणेश बीडकर, लतीफ शेख, डॉ. सिद्धार्थ धेंडे, प्रदीप देशमुख, रुपाली पाटील-ठोंबरे,राजेंद्र शिळीमकर, राहुल भंडारे, हर्षदा फरांदे, संदीप खर्डेकर, दीपक पोटे, सुशील मेंगडे, राजेश येनपुरे, हेमंत लेले, पुष्कर तुळजापूरकर आदी उपस्थित होते.



# उमेदवारासह आमदारांनी सुद्धा बजावला आपल्या मतदानाचा हक्क.

**दैनिक वादळ वार्ता नासिक/सुरेश इंगळे**

राज्यभरात पाचव्या टप्प्यातील मतदान पार पडले असून सकाळपासूनच मतदारांनी मतदानासाठी मतदान केंद्रावर लांबच लांब रांगा लावल्या होत्या. विविध मतदान केंद्रावर मतदार मोठ्या उत्साहाने आपल्या मतदानाचा हक्क बजावताना दिसत होते. त्याचबरोबर नाशिक आणि दिंडोरीतील उमेदवारांनी ही आपल्या मतदानाचा हक्क मोठ्या उत्साहाने बजावताना दिसला. नाशिक लोक सभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार राजाभाऊ वाजे यांनी सिन्नर मधील भटवाडी मतदान केंद्रावर जाऊन सहकुटुंब सहपरिवारा सह आपल्या मतदानाचा हक्क बजावला. यावेळी त्यांची पत्नी आणि मुलगी देखील उपस्थित होते. तसेच नाशिक लोकसभेचे अपक्ष उमेदवार शांतिगिरी महाराज यांनीही त्र्यंबकेश्वर येथील मराठा विद्या प्रसारक महाविद्यालयातील मतदान केंद्रावर जाऊन आपल्या मतदानाचा हक्क बजावला. तसेच



राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी देखील नाशिक शहरातील मॉडेल स्कूल सिडको या ठिकाणी जाऊन मतदान केंद्रावर जाऊन आपल्या कुटुंबीयांसमवेत मतदानाचा हक्क बजावला. तसेच महाविकास आघाडीचे दिंडोरी लोकसभेचे उमेदवार भास्कर भगरे यांनी देखील दिंडोरी तालुक्यातील घोडेगाव येथील मतदान केंद्रावर जाऊन मतदानाचा हक्क बजावला. तसेच दिंडोरी लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार डॉक्टर भारती पवार यांनी देखील कळवण तालुक्यातील दळवट येथील मतदान केंद्रावर जाऊन आपल्या मतदानाचा हक्क बजावला. तसेच निफाडचे आमदार दिलीप बनकर यांनीही आपला मतदानाचा हक्क बजावला असून भाजप नेते डॉक्टर तुषार शेवाळे यांनीही आपले मतदान केले. नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अमिषा मित्तल यांनी देखील शहरातील बॉईज टाऊन हायस्कूलच्या मतदान केंद्रावर जाऊन आपल्या मतदानाचा हक्क बजावला. याशिवाय नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री दादा भुसे यांनी सुद्धा सोयगाव येथील मतदान केंद्रावर जाऊन मतदानाचा हक्क बजावलेला आहे. निफाड चे आमदार दिलीप बनकर यांनीही आपल्या मतदानाचा हक्क बजावला. येत्या ०४-०६- २०२४ पर्यंत सर्व उमेदवारांचे भवितव्य मतदान पेटीत बंद असून सर्व उमेदवार आपल्या विजयाचे स्वप्न बघत आहेत.

## जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केल्याच्या आरोपातून अटकपूर्व जामीन मंजूर.

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केल्या प्रकरणी धारूर तालुक्यातील सोनीमोहा येथील मेघराज बालासाहेब मुंडे यांचा अटकपुर्व जामीन केज जिल्हा सत्र न्यायालयात मंजूर झाला आहे.

धारूर तालुक्यातील सोनीमोहा येथील मेघराज बालासाहेब मुंडे यांनी गावातीलच फिर्यादी यांना जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केल्याप्रकरणी पोलिस स्टेशन धारूर येथे गु.र. नं.१०३/२०२४ कलम ३२४,५०४,५०६ भा. दं. वि व कलम ३(१)(r),३(१)(s) अट्रोसिटी ॲक्ट प्रमाणे दि.२०-०४-२०२४ रोजी गुन्हा केला होता. सदर प्रकरणात आरोपीने जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश केज यांचे न्यायालयात अटकपूर्व जामीन मिळणेसाठी ॲड.डी.एच. मायकर यांच्या मार्फत अर्ज दाखल केला व सदर प्रकरणात मा.जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश केज यांनी आरोपीस योग्य



त्या अटी व शर्तिसह अटकपूर्व जामीन मंजूर केला. या प्रकरणात आरोपीचे वतीने ॲड. डी.एच. मायकर यांनी न्यायालयीन कामकाज पाहिले.

## भेंडाळा येथील युवकाचा शेततळ्यात बुडून मृत्यू



**वादळ वार्ता । प्रतिनिधी**

भेंडाळा येथील युवकाचा शेततळ्यात पाय घसरून पडल्याने पाण्यात बुडून मृत्यू झाला भेंडाळा येथील रहिवासी महेश रवी जाधव (२१) हा मोजाबाद शिवारातील चुळत्याच्या शेतातील शेततळ्यात २० मे रोजी दुपारी चार वाजता गेला असता पाय घसरून शेततळ्यात पडला असता त्यांच्या लहान भावाने आरडाओरड केल्याने आजूबाजूचे शेतकरी जमा झाले त्यांनी महेशला शेततळ्यातून बाहेर काढून गंगापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता तेथील डॉ सुदाम लगास यांनी तपासून मृत घोषित केले याप्रकरणी गंगापूर पोलीस स्टेशनमध्ये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोहे का श्रीकांत बर्डे हे करत आहे त्याच्या पश्चात आई-वडील एक भाऊ चुलते असा परिवार आहे

# बारावीचा निकाल आज जाहीर होणार शिक्षण मंडळाकडून महत्त्वाचे अपडेट

**वादळ वार्ता । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून बारावीचा निकाल आज जाहीर केला जाणार आहे महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळाच्या वतीने बारावीच्या परीक्षेच्या निकालाची तारीख जाहीर करण्यात आली असून आज रोजी २१ मे रोजी दुपारी एक वाजता बारावीचा निकाल जाहीर केला जाणार आहे अशी घोषणा महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळाकडून करण्यात आली आहे त्यामुळे आता बारावीचे विद्यार्थी आणि पालकांना निकालाची उत्सुकता लागली आहे महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात परीक्षा घेण्यात आली होती बारावीच्या परीक्षेसाठी पंधरा लाख १३ हजार ९९९ विद्यार्थ्यांची नोंदणी झालेली असून बारावीची परीक्षा नऊ विभागीय मंडळातर्फे आयोजित करण्यात आली होती मंडळामार्फत फेब्रुवारी मार्च २०२४ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इयत्ता बारावी परीक्षेचा निकाल मंडळाच्या विहित कार्यपद्धतीनुसार उद्या दुपारी जाहीर करण्यात येत आहे महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण




# प्रेस-पोलीस लिहिलेल्या वाहनांची संख्या वाढली! वाहतूक पोलिसांनी शहानिशा करणे गरजेचे !

**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई/परवेज पटेल**

प्रेस आणि पोलीस लिहिलेल्या वाहनांची संख्या शहरात दिवसेंदिवस वाढू लागल्याचे चित्र दिसत असून अशा वाहनांची संपूर्ण शहानिशा केल्याशिवाय सोडण्यात येवू नये. बीड शहरात प्रेस आणि पोलीस लिहिलेल्या वाहनांची संख्या दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे दिसून येत आहे. अशी वाहने चालविणारे खरेच प्रेस आणि पोलीस खात्याशी संबंधित असतात का? असा प्रश्न निर्माण होऊ लागला आहे. वास्तविक पाहता वाहनांवर प्रेस आणि पोलीस लिहिण्यास परवानगी नाही. असे असूनही अनेक वाहनांवर ते लिहिलेले दिसत आहे. एक वेळ जे खरेच प्रेस आणि पोलीस विभागात कर्तव्यावर आहेत अशांच्या वाहनांवर हे लिहिलेले असेल तर समजू शकते मात्र ज्यांचा या दोन्ही विभागाशी दूर-दुरून संबंध नाही किंवा प्रेस व पोलीस विभाग काय असते ? हेही ज्यांना माहित नाही, अशा अनेक गुलछबू तरुणांच्या दुचाकी वर प्रेस आणि पोलीस लिहिलेले आढळून येत आहे. अशी वाहने पकडून त्यांच्यावर कारवाई करणे आवश्यक आहे. यासाठी शहरातील चौका-चौकात कर्तव्यावर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनी प्रेस व पोलीस लिहिलेली वाहने दिसताच अशा वाहनांची व ते चालविणाऱ्यांची सर्व शहानिशा करणे आवश्यक आहे. जेणेकरून खरे प्रेस व पोलीस विभागात कर्तव्यावर असणाऱ्यांना अशा गुलछबू तरुणांचा व त्यांच्या वाहनांचा त्रास होणार नाही. म्हणून पोलीस कर्मचाऱ्यांनी प्रेस व पोलीस लिहिलेल्या वाहनांची संपूर्ण शहानिशा केल्याशिवाय सोडण्यात येऊ नये आणि तपासणी मोहीम हाती घ्यावी.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )